# मनोविकृतीशास्त्र विभाग

बै.जी.शा.वैद्यकिय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे

जा.क्र.मनोवि/ 116 /२०२१ दिनांक 04 /०३/२०२१

प्रति,
मा.अधिष्ठाता,
बै.जी.शा.वै.म.वि व ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे

विषय - मनोविकृतीशास्त्र विभागात Addiction Treatment Facility (व्यसनाधीनता उपचार सुविधा केंद्र) सुरु करणेकरीता कंत्राटी पदभरतीच्या जाहिरातीबाबत...

महोदय,

उपरोक्त विषयी आपणांस सविनय सादर करण्यात येत आहे की, मनोविकृतीशास्त्र विभागात Addiction Treatment Facility (व्यसनाधीनता उपचार सुविधा केंद्र) सुरु करणेकरीता कंत्राटी पदभरती करण्यात येणार आहे. सदरची छोटेखानी जाहिरात स्थानिकं वृत्तपत्रात देण्यात येणार आहे. तसेच याबाबतची विस्तृत जाहिरात ही बै.जी.शा.वै.म. चे www.bjmcpune.org या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबतची मान्यता मिळावी, हि नम्र विनंती.

विस्तृत जाहिरात आपल्या माहितीस्तव सविनय सादर,

आपला विश्वासू,

(डॉ.नितीन अभिवंत)
सहयोगी प्राध्यापक - विभागप्रमुख
मनोविकृतीशास्त्र विभाग
बै.जी.शा.वै.म.पुणे

Permitted

04/3

Dean
B. J. Govt. Medical College, Pune

मनोविकृतीशास्त्र विभाग, बै.जी.शा.वैद्यकीय महाविद्यालय
ससून सर्वोपचार रुग्णालय आवार पुणे-४११ ००१.
ईमेल – psybjgmc@gmail.com दुरध्वनी क्रमांक – ०२०-२६१२७३३१/०२०-२६१२८०००/Ext.२३४७

बैजीशावैम/मनोवि/११५/२०२१ दि.०४/०३/२०२१

कंत्राटी पदभरती

**ADDICTION TREATMENT FACILITY**

(व्यसनाधीनता उपचार सुविधा केंद्र)

**National Drug Dependence Treatment Center (NDDTC), All India Institute of Medical Sciences (AIIMS), New Delhi,** यांच्या मार्गदर्शनाखाली मनोविकृतीशास्त्र विभाग, बै.जी.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे येथे बाहयरुग्ण तत्वावर **ADDICTION TREATMENT FACILITY (ATF)** सुरु करण्यात येणार असुन त्याकरीता खालील पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदाचे नांव | पदांची सख्या | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | Medical Officer (वैद्यकीय अधिकारी) | ०१ | MBBS from recognized Institution along with Medical Council Registration (मनोविकृतीशास्त्रामध्ये MD अथवा समतुल्य पद्व्युत्तर पदवी असल्यास प्राधान्य) | खुला प्रवर्ग ३८ वर्ष<br>राखीव प्रवर्ग ४३ वर्ष | रु. ६००००/- दरमहा |
| २ | (Nurse) (परिचारीका) | ०१ | ANM (GNM अथवा BSc Nursing असल्यास प्राधान्य) | खुला प्रवर्ग ३८ वर्ष<br>राखीव प्रवर्ग ४३ वर्ष | रु.२००००/- दरमहा |
| ३ | Counsellor (समुपदेशक) | ०१ | Psychology/Social Work/Sociology विषयातील पदवी (वरील विषयात Masters असल्यास प्राधान्य) | खुला प्रवर्ग ३८ वर्ष<br>राखीव प्रवर्ग ४३ वर्ष | रु.२००००/- दरमहा |
| ४ | Data Manager (माहिती व संगणक व्यवस्थापक) | ०१ | पदवीधर कोणत्याही शाखेतील (MS-CIT, English / Marathi Typing अथवा अनुभव असल्यास प्राधान्य | खुला प्रवर्ग ३८ वर्ष<br>राखीव प्रवर्ग ४३ वर्ष | रु.१८०००/- दरमहा |

## अटी व शर्ती :-

१) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असून, नियुक्ती कालावधी हा नियुक्तीच्या दिनांकापासून अकरा महिन्यांकरीता (११ महिन्यांसाठी) वैध राहिल.

२) जाहीरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागू राहणार नाही, तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३) अर्जदार हा संबधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

४) उपरोक्त कंत्राटी पदांकरीता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.

५) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल.

६) फक्त शासकीय, निमशासकीय तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत असणा-या अनुभवाचा विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल.

७) जाहीरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष व मागासवर्गीयांसाठी ४३ वर्षे राहील.

८) निवड झालेल्या उमेदवारांना रु.१००/- च्या बॉडपेपरवर अटी व शर्ती लिहून करारनामा सादर करणे

बंधनकारक राहील.

९) विशेषतज्ञ/कर्मचारी या पदांकरीता शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्त विशेषतज्ञ/ कर्मचारी या पदांरीता अर्ज करीत असल्यास त्यांनी शासकीय सेवेत रुजू झालेचा दिनांक, कार्यकाळ, पदनाम, व निवृत्त झालेचे वर्ष, सेवानिवृत्तीच्या दिनांकास मिळालेले अंतिम वेतन व सेवानिवृत्ती नंतर देय असलेले वेत (पेन्शन), याबाबतची संपुर्ण माहिती अर्जामध्ये नमुद करावी.

१०) एकापेक्षा अधिक पदांरीता अर्ज करावयाचा असल्यास उमेदवारांनी प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज सादर करावेत.

११) उपरोक्त पदांपैकी तांत्रिक पदांकरीता, स्टाफ नर्स, वैद्यकीय अधिकारी व विशेषतज्ञ इ. पदांकरीता तत्सम कौन्सिलचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. अन्यथा उमेदवारास मुलाखतीस अपात्र ठरविले जाईल.

१२) एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करताना अर्जासोबत, पदांचा प्राधान्यक्रम मुलाखतीचे पुर्वी कार्यालयास सादर करावा.

१३) उमेदवारांनी त्यांची संपूर्ण माहिती (सोबत जोडलेल्या नमून्याप्रमाणे) स्वतःच्या पासपोर्ट आकारातील छायाचित्रासह सदरचा अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रतींसह मनोविकृतीशास्त्र विभाग, कक्ष क्र.२६ बै.जी.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, ससून सर्वोपचार रुग्णालय आवार, पुणे - ४११००१ येथे दि.२०/०३/२०२१ सायंकाळी ५.०० वाजेपर्यत कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळून व्यक्तीशः सादर करावेत अथवा पोस्टाने/ कुरीयरने : नोडल ऑफिसर, **ATF MCH Pune,** मनोविकृतीशास्त्र विभाग बै.जी.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, ससून सर्वोपचार रुग्णालय आवार, पुणे - ४११ ००१ या पत्त्यावर दि.२०/०३/२०२१ सायंकाळी ५.०० वाजेपर्यत प्राप्त होतील याअनुषंगाने पाठवावेत. अर्ज सादर करताना पाकिटावर पदाचे नाव स्पष्ट लिहावे. या मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही अर्जाचा विचार भरतीप्रक्रियेकरीता करण्यात येणार नाही व याबाबत कुठलीही तक्रार अथवा शंका विचारात घेतली जाणार नाही.

१४) उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार अर्जाची छाननी करुन मुलाखतीस अर्हताप्राप्त उमेदवारांची यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल व याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार अथवा कोणताही संपर्क संबधितांना करण्यात येणार नाही. त्यामळे उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळांला भेट देऊन याबाबतची माहिती घ्यावी. याबाबतचे वेळापत्रक खालीलप्रमाणे राहिल.

| अ. क्र. | भरती प्रक्रियेतील टप्पे | तारीख |
|---|---|---|
| १ | अर्ज प्राप्तीची अंतिम तारीख | दि.२०/०३/२०२१<br>सायंकाळी ०५.०० वाजेपर्यत |
| २ | अर्ज छाननी व मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | दि.२३/०३/२०२१ |
| ३ | मुलाखतीची तारीख, वेळ व स्थान | दि.२५/०३/२०२१<br>मनोविकृतीशास्त्र विभाग बैजीशावैम.पुणे<br>सकाळी १०.०० वाजता |
| ४ | पदाकरीता निवड झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | दि.३०/०३/२०२१ |

१५) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना रु.१५०/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी रु.१००/- चा "**ATF MCH Pune**" या नावे देय असलेला Payble at Pune हा डिमांड ड्राफट अर्जासोबत जोडावा. ड्राफटच्या मागे उमेदवाराने स्वतःचे संपूर्ण नाव व ज्या पदासाठी अर्ज सादर करीत आहे त्या पदाचा स्पष्ट उल्लेख करावा.

१६) निवड प्रक्रियेतील पात्र / अपात्र उमेदवारांची यादी तसेच निवड यादी मनोविकृतीशास्त्र विभाग बैजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर तसेच **www.bjmcpune.org** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल व याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारांसोबत केला जाणार नाही.

१७) निवड यादीतील गुणक्रमांकाचे आधारे प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

१८) निवड झालेल्या उमेदवारांनी शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम असल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक किंवा वैद्यकीय अधिक्षक यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. त्यानंतरच नियुक्ती आदेश देण्यात येईल.

१९) निवड झालेल्या उमेदवाराने नियुक्ती नंतर काही कारणास्तव कामावर रुजू न झाल्यास अथवा रुजू झाल्यानंतर मुदतीपुर्वी पद सोडावयाचे असल्यास उमेदवाराने तशी पुर्वसचना एक महिना अगोदर संबधित अधिका-यास देणे बंधनकारक राहिल. तसेच अशा परिस्थितीमध्ये प्रतिक्षा यादीतील उमेदवारास गुणानुक्रमे सदर पदावर नियुक्तीस प्राधान्य देण्यात येईल व त्याकरीता वेगळी जाहिरात व भरती प्रक्रिया राबविण्यात येणार नाही.

२०) मुलाखतीकरीता उपस्थित उमेदवारांना प्रवासभत्ता अथवा इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

२१) सदर पदांकरीता मुलाखतीच्या वेळेस सर्व उमेदवारांनी शासनाने वेळोवेळी सुचविलेले कोरोना प्रतिबंधक सुचनांचे पालन करणे आवश्यक राहील.

२२) भरती प्रक्रिया स्थगित करणे/रद्द करणे, भरती वेळापत्रकात बदल करणे, पदभरती प्रक्रियेत कोणत्याही वेळी बदल करण्याचे सर्व अधिकार मा.नोडल अधिकारी ATF MCH Pune यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणताही याबाबत कोणतीही तक्रार व दावा करता येणार नाही.

या भरती प्रक्रियेसंबंधीची सर्व माहिती मनोविकृतीशास्त्र विभागाच्या नोटीसबोर्डवर व www.bjmcpune.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. ईच्छुक उमेदवारांनी नियमितपणे सदर संकेतस्थळास भेट देवून याबाबतची माहिती घ्यावी.

- खालीलप्रमाणे आवश्यक असलेल्या मुळ कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या प्रती अर्जाच्या नमुन्यासोबत जोडाव्यात.

  १) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका २) जातीचे प्रमाणपत्र ३) शाळा सोडल्याचा /जन्मतारखेचा दाखला ४) प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्रे ५) पासपोर्ट आकाराचे २ फोटो ६)शासकीय अनुभव असलेला अनुभव दाखला ७) डिमांड ड्राफट

स्वाक्षरी<br>
नोडल अधिकारी<br>
**ATF MCH Pune**<br>
मनोविकृतीशास्त्र विभाग,<br>
बै.जी.शा.वै.महाविद्यालय, पुणे.

**PROFORMA FOR APPLICATION (अर्जाचा नमुना)**

| Recent Passport Size Photo |
|---|

| | |
|---|---|
| **Name of the Post Applied for :-** | |
| Name of Candidate:- | |
| Email ID:- | |
| Address for Correspondence: | |
| Mobile No:- | |
| Date of Birth:- | |
| Religion:- | |
| Category: | |
| Caste:- | |

Educational Qualification:-

| Sr. No | Degree/ Qualification | Board/University | Year of Passing | Total Marks out of | Aggregate % obtained |
|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | |
| 2 | | | | | |
| 3 | | | | | |
| 4 | | | | | |

Work Experience:- (Starting with latest work experience)

| Sr. No | Post held | Name of Organization | Duration | | Reason for change |
|---|---|---|---|---|---|
| | | | From | To | |
| 1. | | | | | |
| 2. | | | | | |
| 3. | | | | | |
| 4. | | | | | |

**Attach attested photocopies of following documents:- (tick the relevant boxes)**

| | | |
|---|---|---|
| 1 | MMC / MNC / RCI registration with renewal slip | |
| 2 | Degree/ Diploma certificate | |
| 3 | Nationality & Domicile certificate | |
| 4 | Caste certificate and Caste validity certificate | |
| 5 | Experience certificates | |
| 6 | Birth / School Leaving certificate | |

( Note: Incomplete application form with documents will not be accepted )

**Self Declaration**

I hereby declare that all above information / documents submitted by me are true and correct to the best of my knowledge and belief. If any information found false institute shall be free to cancel my admission. I understand and agree that misrepresentation or omission of facts will justify the denial of admission.

Date: / /2021

Place:

**(Applicant Name & Signature)**